संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/ १-५६२ /२०२०                                दिनांक ३१ जुलै, २०२०

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय.. संचारबंदी शुक्रवार सायंकाळी ७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत.**

संदर्भ - जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.कक्ष २७/कलि/गृह विभाग/ कावि ४३२/२०२० दि.३०.७.२०२०

कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हादंडाधिकारी, अमरावती यांनी संदर्भांकित दिलेले आदेश यासोबत जोडण्यात येत असून त्यात नमूद आदेशाचे पालन करण्यात यावे.

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता -

१) वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

२) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/ प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व सदर सूचना त्यांच्या अधिनस्थ अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

३) मानद संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा

४) उपकुलसचिव (म.वि.), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक अमरावती जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

५) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

६) मा. प्र-कुलगुरूंचे स्वीय सहायक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

७) कुलसचिवाचे स्वीय सहायक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव (प्रशा.)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)
☎: ०७२१-२६६२०२५/२६६२९९३ फॅक्स : ०७२१-२६६२८८३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in

क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि- ४३२/२०२० दिनांक 30/०७/२०२०

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि-३७३/२०२० दि. ३०/०६/२०२०
४. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि- ३७७/२०२० दि.०६/०७/२०२०
५. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि. ३५६/२०२० दि. ०१/०६/२०२०
६. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २९/०७/२०२०
७. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि- २१४/२०२० दि. १३/०७/२०२०
८. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि- ३८२/२०२० दि. २७/०६/२०२०
९. या कार्यालयाकडील शुध्दीपत्रक क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि- ३७९/२०२० दि. ०८/०७/२०२०
१०. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कालि/गृह विभाग/कावि- २४३-A/२०२० दि. २४/०७/२०२०

## आदेश

**(संचारबंदी आदेश दिनांक ०१/०८/२०२० ते ३१/०८/२०२०)**

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्ह्याच क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासन यांचेकडील सूचनापत्रात नमूद केल्याप्रमाणे संदर्भिय क्र. ३ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार दिनांक ०१/०७/२०२० ते ३१/०७/२०२० पर्यंत अमरावती शहर व जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागाकरीता संचारबंदीचे आदेश पारीत करण्यात आले आहे तसेच या संचारबंदी कालावधीमध्ये आठवडयाअखेर शुक्रवार सध्याकाळी ७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत संचारबंदी असल्याबाबत संदर्भिय क्र. ८ अन्वये आदेश पारीत करण्यात आले आहे.

तथापी महाराष्ट्र शासन यांचेकडील संदर्भिय क्र. ६ अन्वये दिलेल्या सूचनापत्रानुसार निर्बंधामध्ये सुलभता व टप्प्याटप्प्याने लॉकडाउन उघडण्याबाबत Mission Begin अंतर्गत दिलेल्या दिशानिर्देशानुसार मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी अमरावती खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**०१. सदरचे संचारबंदीचे आदेश हे दिनांक ०१/०८/२०२० चे ००.०० वा. पासून ते दिनांक ३१/०८/२०२० चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. या कालावधीत आठवडयाअखेर शुक्रवार संध्याकाळी ७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत संचारबंदी असल्याबाबत संदर्भिय क्र. ८ अन्वये पारीत करण्यात आलेले आदेश हे दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे.**

**०२. संदर्भिय क्र. ५ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोविड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरीता Annexure I मध्ये दिलेल्या निर्देशांन्वये देण्यात आलेले आदेश हे यापुढेही दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत कायम राहतील.**

**०३. संदर्भिय क्र. ६ अन्वये महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या सूचनापत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे कोविड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांकरीता Annexure II मध्ये दिलेल्या निर्देशांन्वये संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता खालील प्रमाणेआदेश पारीत करण्यात येत आहे.**

१. सर्व प्रकारच्या अत्यावश्यक सेवा अंतर्गत असलेली दुकाने ज्यांना यापूर्वी सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहेत ती यापुढेही नियमितपणे सुरु राहतील.
२. सर्व प्रकारची बिगर जिवनावश्यक दुकाने/आस्थापना हयांना संदर्भिय क्र. ४ व ५ च्या आदेशान्वये सकाळी कालावधीत देण्यात आलेली सूट हि महानगरपालीका/नगर परिषद/नगर पालीका यांनी निश्चित केलेल्या धोरणास अधिन राहून दिनांक ३१.०८.२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत असून सर्व बिगर जिवनावश्यक दुकाने/आस्थापना हया सकाळी ९.०० ते सायं. ७.०० वा. पर्यंत सुरु राहतील.
3. सर्व प्रकारची मॉल्स अणि मार्केट कॉम्प्लेक्स हे त्यामधील चित्रपटगृह, खाद्यगृह, रेस्टॉरंट वगळता दिनांक ०५ ऑगस्ट २०२० पासून सकाळी ९.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत सुरु राहतील तथापी अशा मॉल्स/मार्केट कॉम्प्लेक्स मधील असलेली रेस्टॉरंट मधील किचन व खाद्यगृह यांना घरपोच सेवा देण्याकरीता परवानगी अनुज्ञेय राहील.
४. ई-कॉमर्स क्षेत्राकरीता सर्व प्रकारच्या अत्यावश्यक व बिगर अत्यावश्यक सेवा सुरु ठेवण्याकरीता परवानगी राहील.
५. महानगरपालीका/नगर परिषद/नगरपालीका क्षेत्रातील ज्या उद्योगांना सुरु ठेवण्याकरीता यापूर्वी परवानगी देण्यात आलेली आहे ते सर्व उद्योग सुरु ठेवण्याकरीता परवानगी राहील.
६. महानगरपालीका/नगर परिषद/नगर पालीका क्षेत्रातील सर्व प्रकारची बांधकामे (सार्वजनिक/खाजगी/शासकीय) ज्यांना परवानगी प्रदान करण्यात आलेली आहे ती सर्व सुरु राहतील. पावसाळयापूर्वी करावयाची सर्व प्रकारची (सार्वजनिक/खाजगी/शासकीय) कामे सुरु राहतील.
७. रेस्टॉरेंट/खाद्यगृहे यांचे मार्फत घरपोच सेवा देता येईल.
८. ऑनलाईन/दुरस्थ शिक्षण व त्या संबंधित असलेल्या उपक्रमांना परवानगी राहील व त्याला अधिक वाव देण्यात यावा.
९. सर्व प्रकारच्या शासकीय कार्यालये (अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आरोग्य व वैद्यकीय, कोषागार, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस, NIC, अन्न व नागरी पुरवठा, FCI, N.Y.K., महानगरपालीका सेवा वगळून) हया १५% किंवा १५ व्यक्ती यापैकी जी संख्या जास्त असेल ती ग्राहय धरुन सुरु राहतील.
१०. सर्व प्रकारच्या खाजगी कार्यालयातील आस्थापना हया एकूण १०% किंवा कमीत कमी १० कर्मचारी यापैकी जी संख्या जास्त असेल ती ग्राहय धरुन सुरु राहतील.
११. स्वयंरोजगार उपक्रमासंबधित असलेल्या व्यक्ती उदा. प्लंबर्स, इलेक्ट्रीशिअन, किड नियंत्रक, तांत्रीक कामे करणारे यांना त्यांची कामे करण्याकरीता परवानगी अनुज्ञेय राहील.
१२. सर्व प्रकारचे वाहन दुरुस्तीबाबतचे गॅरेज, कार्यशाळा यांनी वाहन दुरुस्ती करतांना टप्पेनिक वेळ देऊन कामे करावी.
१३. अत्यावश्यक तसेच कार्यालयीन कामाकरीता जिल्हयाअंतर्गत हालचाल करण्यास परवानगी अनुज्ञेय राहील.
१४. ग्राहकांनी दुकानामध्ये खरेदी करण्याकरीता जवळपास असलेल्या बाजारपेठ, अतिपरिचित दुकानदार यांचा वापर करावा. शक्यतो दुरचा प्रवास करुन खरेदी करणे टाळावे.
१५. लग्नसमारंभाकरीता या पूर्वी पारीत करण्यात आलेल्या संदर्भिय क्र. ७ चे आदेश हे दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे त्यानुसार लग्नसमारंभाकरीता २५ व्यक्तींना (वधू व वरासह) परवानगी अनुज्ञेय राहील.
१६. सर्व बाहय ठिकाणच्या सार्वजनिक हालचाली हया पूर्वी दिलेल्या निर्बंधासह सुरु ठेवता येतील.
१७. वृत्तपत्रांची छपाई व वितरणास घरपोच सेवा सह परवानगी अनुज्ञेय राहील.
१८. सर्व प्रकारची शैक्षणिक कार्यालये (विद्यापीठ, महाविद्यालये, शाळा) येथील अशैक्षणीक कर्मचारी, संशोधन कर्मचारी, वैज्ञानिक यांना ई-माहिती, उत्तरपत्रीका तपासणे, निकाल घोषित करणे इ. कामाकरीता परवानगी अनुज्ञेय राहील.
१९. सर्व प्रकारची कटींगची दुकाने, सलुन, ब्यूटी पार्लर ही संदर्भिय क्र. ८ च्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे यापुढेही दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत सुरु राहतील.
२०. बाहय असांघीक खेळ उदा. गोल्फ, मैदानी गोळीबार (Outdoor Firing Range), जिम्नास्टीक, टेनीस, बॅडमिंटन, मल्लखांब हया खेळांना भौतिक व सामाजिक अंतर राखून तसेच निर्जंतुकीकरण च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह

दिनांक ०५/०८/२०२० पासून सुरु ठेवण्यास परवानगी अनुज्ञेय राहील तथापी जलतरण तलाव यांना सुरु ठेवण्यास परवानगी राहणार नाही.

२१. सर्व प्रकारची सार्वजनिक व खाजगी वाहतूक करतांना चार चाकी गाडीमध्ये चालकाव्यतीरिक्त इतर ३ प्रवासी अनुज्ञेय राहतील. तीन चाकीगाडी (उदा. ऑटो) मध्ये चालकाव्यतीरिक्त दोन प्रवासी, दुचाकीवर हेल्मेट व मास्क सह २ प्रवासी यांना परवानगी राहील.

२२. या व्यतीरिक्त यापूर्वी च्या आदेशान्वये परवानगी दिलेल्या सर्व उपक्रमांना दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत परवानगी अनुज्ञेय राहील.

२३. आंतर जिल्हा बस वाहतूक करतांना बस मधील असलेल्या एकूण प्रवासी क्षमतेच्या ५०% प्रवाशी सह सोशल डिस्टंसिंग व निर्जंतूकीकरण करुन वाहतूकीकरीता परवानगी अनुज्ञेय राहील. याकरीता विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांनी नियोजन करावे.

**०४. संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागामध्ये संचारबंदीच्या कालावधीत खालील सेवा प्रतिबंधीत राहतील.**

१. सर्व प्रकारची शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक प्रशिक्षण केंद्रे, खाजगी शिकवणी वर्ग, कोचिंग क्लासेस, हे बंद राहतील.
२. सर्व प्रकारची हॉटल्स, रेस्टॉरंट हे बंद राहतील केवळ हॉटेल्स रेस्टॉरंट यांना त्यांच्या स्वयंपाकगृह हे घरपोच सेवा देण्याकरीता चालू ठेवण्याकरीता परवानगी असेल.
३. सर्व प्रकारची सिनेमागृहे, व्यायामशाळा, जलतरण तलाव, मनोरंजन उद्याने, नाट्यगृहे, बार (मद्यगृहे), प्रेक्षकगृहे, व इतर संबंधित ठिकाणे ही बंद राहतील.
४. सर्व प्रकारची सामाजिक, राजकीय, मनोरंजन, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम व इतर स्नेहसंमेलन हे या कालावधीत बंद राहतील.
५. सर्व प्रकारची धार्मिक स्थळे/धार्मिक पुजा स्थळे हे सर्व नागरिकांसाठी संचारबंदीच्या कालावधीत बंद राहतील.

संदर्भिय क्र. ५ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील मुददा क्र. ०८ नुसार पी-०१, पी-०२ या तत्वावर (रस्ता/गल्ली यांच्या एका बाजूला असलेली दुकाने सम तारखेस व (रस्ता/गल्ली यांच्या दुसऱ्या बाजूला असलेली दुकाने विषम तारखेस) देण्यात आलेले आदेश या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे. यापुढे सर्व प्रकारचे बाजार, बाजारपेठ क्षेत्रातील दोन्ही बाजुची दुकाने ही सोमवार ते शुक्रवार नियमितपणे सकाळी ९.०० ते सायं. ७.०० पर्यंत सुरु राहतील. संदर्भिय क्र. ४ अन्वये आठवडयाअखेर शुक्रवार संध्याकाळी ७.०० ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत असलेल्या संचारबंदीच्या वेळी दुग्धविक्रेते/डेअरी यांची दुकाने ही यापुढे सकाळी ९.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत (आठवडयाचे ७ ही दिवस) नियमितपणे सुरु राहतील.

संदर्भिय क्र. ९ च्या शुध्दीपत्रकान्वये कृषि निविष्ठा व त्यासंबधित असलेली कृषि सेवा केंद्रे, किटकनाशक विक्री केंद्रे, बि-बियाणे विक्री सेवा केंद्रे आठवडयातील शुक्रवार सायंकाळी ७.०० वा. पासून ते सोमवार सकाळी ७.०० पर्यंत त्यांना निर्धारित करुन दिलेल्या वेळेत नियमितपणे सुरु राहतील असे आदेश पारीत करण्यात आले आहे सदरचे आदेश हे दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे. तसेच संदर्भिय क्र. १० अन्वये राष्ट्रीयकृत, सहकारी बँक, खाजगी बँक, सहकारी संस्था, पतपेढी संस्था व आर्थिक बाबी संबंधी असलेल्या सर्व वित्तीय संस्था त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे शनिवार व रविवार या संचारबंदी कालावधीत यापुढेही दि. ३१/०८/२०२० पर्यंत सुरु ठेवता येईल.

संदर्भिय क्र. ५ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील मुददा क्र. ५ अन्वये Containment Zone करीता दिलेल्या मार्गदर्शक सूचना हया दिनांक ३१/०८/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत असून त्या लागू राहतील याची नोंद घ्यावी तसेच उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सर्व जिवनावश्यक, बिगर जिवनावश्यक व इतर आस्थापना, दुकाने ही दररोज सकाळी ९.०० ते दुपारी ७.०० वा. पर्यंत (Containment Zone वगळून) या कालावधीत सुरु राहतील तसेच संदर्भिय क्र. ५च्या आदेशान्वये उक्त संचारबंदीमध्ये अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्यात आले होते सदर चे आदेश सुध्दा दि. ३१/०८/२०२० पर्यंत कायम ठेवण्यात येत आहे.

सदरचे संचारबंदीचे आदेश हे दिनांक ०१/०८/२०२० चे ००.०० वा. पासून ते दिनांक ३१/०८/२०२० चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. सदरहू आदेश आज दिनांक /०७/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाव्दारे Public Address System व्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

(शैलेश नवाल)
**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. पोलीस आयुक्त (शहर)/ पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी व या आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
८. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
९. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१०. उपविभागीय दंडाधिकारी ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
११. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ---------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१२. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत -------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१३. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१४. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१५. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१६. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१७. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१८. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,नागपुर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुन ५ प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावा.
१९. संबंधित सर्व विभाग ----------------------------यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**